सोमवार दि. १० ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३४० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## ‘गण गण गणात बोते’च्या जयघोषाने जालना दुमदुमले; श्री गजानन महाराज पालखीचे मनपातर्फे भक्तिभावाने स्वागत

### महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत यांची उपस्थिती; पालखीवर पुष्पवृष्टी करून भाविकांनी घेतले दर्शन






**जालना -प्रतिनिधी**

‘गण गण गणात बोते’, ‘गजानन महाराज की जय’च्या जयघोषाने रविवारी जालना शहरातील वातावरण भक्तिमय झाले. पंढरपूर येथील आषाढी एकादशीची वारी पूर्ण करून शेगावकडे मार्गस्थ झालेल्या श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे जालना शहरात आगमन होताच भाविकांनी मोठ्या उत्साहात पालखीचे स्वागत केले. जालना महानगरपालिकेच्या वतीने पालखीचे पारंपरिक पद्धतीने भक्तिभावाने स्वागत करण्यात आले. महानगरपालिकेच्या वतीने महापौर वंदनाताई मगरे आणि उपमहापौर राजेश राऊत यांनी पालखीचे स्वागत करून श्री गजानन महाराजांचे दर्शन घेतले. यावेळी पालखीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. महापौर व उपमहापौरांनी श्रींच्या चरणी नतमस्तक होत जालना शहरातील नागरिकांच्या सुख, समृद्धी, आरोग्य आणि भरभराटीसाठी प्रार्थना केली. श्री गजानन महाराजांची पालखी दरवर्षी आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे दाखल होते. विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेतल्यानंतर पालखी शेगावच्या दिशेने परतीच्या प्रवासाला निघते. या प्रवासादरम्यान पालखीचे जालना शहरात आगमन झाले. पालखी जालना शहरात दाखल झाल्याची माहिती मिळताच परिसरातील भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. पालखीच्या (पान २ वर)

## सामाजिक न्यायासाठी आंदोलन कोणी करायचे हेही सरकार ठरवणार का?

### मराठा आंदोलक राजेंद्र दातेपाटील यांना ताब्यात घेतल्याच्या कारवाईचा डॉ. संजय लाखे पाटील यांच्याकडून तीव्र निषेध

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

: ‘‘राज्यात सामाजिक न्यायासाठी आंदोलन कोण करायचे, हेही सरकार ठरवणार का?’’ असा घणाघाती सवाल मराठा क्रांती मोर्चा व सकल मराठा समाजाचे राज्य समन्वयक डॉ. संजय लाखेपाटील यांनी उपस्थित केला आहे. ज्येष्ठ मराठा आंदोलक, याचिकाकर्ते व संविधानिक अभ्यासक राजेंद्र दातेपाटील यांना आंदोलनासाठी सहकाऱ्यांसह एकत्र येण्यापूर्वीच पोलिसांनी



ताब्यात घेतल्याचा आरोप करत डॉ. लाखेपाटील यांनी या कारवाईचा तीव्र निषेध केला आहे.

हैदराबाद संस्थानातील कुणबी पुरावे नसलेल्या मराठा (पान २ वर)

## जलसंधारणाच्या कार्याची दखल; भाऊसाहेब घुगे यांना ‘जलक्रांती योद्धा’ पुरस्कार

### नदी-नाला पुनर्जीवन, जलसाठा निर्मिती व वृक्षलागवडीतील योगदानाचा गौरव

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यात जलसंधारण, नदी-नाला खोलीकरण व रुंदीकरण, जलसाठा निर्मिती तसेच वृक्षलागवडीच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख तथा नाम फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक आणि नाथ फाउंडेशनचे अध्यक्ष भाऊसाहेब घुगे यांना ‘जलक्रांती योद्धा’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मराठी न्यूज चॅनलच्या



वतीने छत्रपती संभाजीनगर येथील मंगलम रिसॉर्ट, गंगापूर रोड येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात कॅबिनेट मंत्री अतुलजी सावे यांच्या हस्ते भाऊसाहेब घुगे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी माजी केंद्रीय मंत्री भागवतजी कराड, आमदार बबनराव लोणीकर, आमदार प्रशांत बंब, आमदार प्रकाश सोळंके, लोकशाही मराठीचे संपादक विशाल पाटील (पान २ वर)

## जालना रेशिम उद्योगाला मिळणार हक्काची बाजारपेठ; उद्घाटनाची तयारी अंतिम टप्प्यात

### आ. अर्जुनराव खोतकरांकडून रेशिम बाजारपेठ व प्रशासकीय इमारतीच्या तयारीचा आढावा

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील बहुप्रतीक्षित रेशिम बाजारपेठ व प्रशासकीय इमारतीच्या उद्घाटनाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून, या पार्श्वभूमीवर शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी रविवारी प्रत्यक्ष बाजारपेठेच्या ठिकाणी भेट देऊन उद्घाटन कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेतला. येत्या १४ ऑगस्ट २०२६ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रेशिम बाजारपेठ व प्रशासकीय



इमारतीचे उद्घाटन होणार आहे. या पाहणीदरम्यान जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, जिल्हा रेशिम अधिकारी मोहिते यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बाजारपेठेच्या इमारतीची सद्यस्थिती, उद्घाटन कार्यक्रमासाठी करण्यात येणाऱ्या व्यवस्था, शेतकऱ्यांसाठी उपलब्ध सुविधा, परिसरातील मूलभूत सोयी-सुविधा तसेच कार्यक्रमस्थळी आवश्यक असलेल्या व्यवस्थांबाबत आ. खोतकर यांनी अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.

**‘माझे स्वप्न पूर्ण होत असल्याचा आनंद’**

पाहणीदरम्यान आ. अर्जुनराव खोतकर यांनी रेशिम बाजारपेठ उभारणीमागील आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, ‘‘मी वस्त्रोद्योग राज्यमंत्री असताना राज्यातील पहिली रेशिम बाजारपेठ जालना येथे सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी प्रशासनाकडून जागा उपलब्ध करून घेतली आणि (पान २ वर)

## हैदराबाद गॅझेट’च्या अंमलबजावणीवरून मराठा क्रांती मोर्चा आक्रमक;आरक्षणाबाबत स्पष्ट कार्यपद्धतीची मागणी

### ९ ऑगस्टपासून छत्रपती संभाजीनगरातील क्रांती चौकात उपोषणाचा निर्धार

**जालना - प्रतिनिधी**

मराठा समाजाच्या आरक्षणाच्या प्रश्नावर ‘हैदराबाद गॅझेट’च्या अंमलबजावणीबाबत स्पष्टता आणावी, तसेच घटनात्मक आणि न्यायालयीन कसोटीवर टिकणारे शाश्वत आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मराठा क्रांती मोर्चाने पुन्हा आंदोलनाची हाक दिली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौकात ९ ऑगस्टपासून उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, ज्येष्ठ आरक्षण अभ्यासक तथा मराठा आरक्षण प्रकरणातील हस्तक्षेप याचिकाकर्ते राजेंद्र दाते पाटील उपोषणास बसणार असल्याची माहिती राज्य समन्वयक डॉ. संजय लाखेपाटील यांनी दिली. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेत पुरावे आणि वंशावळ असलेल्या अर्जदारांना पात्र ठरविले जात आहे. मात्र, हैदराबाद संस्थानातील मराठा समाजाकडे पूर्वीच्या नोंदी किंवा वंशावळीचे पुरावे उपलब्ध नसतील तर त्यांना आरक्षणाचा लाभ कसा मिळणार? हा प्रमुख प्रश्न मोर्चाने उपस्थित केला आहे. हैदराबाद गॅझेटच्या आधारे आरक्षणाचा मार्ग सुकर होईल, अशी अपेक्षा असताना त्याच्या अंमलबजावणीसाठी निश्चित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीमुळे मराठा असलेल्या (कुणबी पुरावे नसलेल्या ) लाखो करोड अर्जदाराचा प्रमाणपत्र मिळणे व आरक्षणाचा मार्गच बंद झाला आहे आणि मराठा समाजासमोर भविष्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचा दावा मोर्चाने केला आहे. त्यामुळे पात्रता निश्चित करण्याची प्रक्रिया अधिक स्पष्ट, सुलभ आणि न्यायालयीन कसोटीवर टिकणारी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. एसईबीसी प्रवर्गाला शिक्षण, नोकरी, शिष्यवृत्ती, शुल्क सवलत आणि शासकीय योजनांचा लाभ देण्यात यावा. मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण करावी, सारथी संस्थेला (पान २ वर)

## भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्ह्याची अत्यंत महत्वाची बैठक - जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे

**जालना - प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्ह्याची अतिशय महत्वाची बैठक दि.११ ऑगस्ट २०२६ बुधवार रोजी दुपारी १.०० वा, भाजपा जिल्हा कार्यालय जालना येथे आयोजित करण्यात आली असून, या बैठकीस जालना जिल्हा लोकनेते माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री मा.आ.बबनराव लोणीकर हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी आ.नारायण कुचे, आ.संतोष पाटील दानवे, माजी आ.कैलास गोरंटयाल, माजी आ.विलासबापू खरात, घनसावंगी विधानसभा प्रमुख सतीश घाटगे, प्रदेश चिटणीस राहुल लोणीकर, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या बैठकीमध्ये दि.१४ ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते तसेच भाजपा प्रदेशाध्यक्ष आ.रवींद्रजी चव्हाण यांच्या



प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पार्टी जालना जिल्ह्याच्या नवीन जिल्हा कार्यालयाच्या इमारतीच्या भूमिपूजन समारंभ होणार असून त्या नंतर त्या ठिकाणी राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी केलेली ऐतिहासिक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्ज माफी योजना जाहीर करून निर्णय घेतल्याबद्दल त्यांचा जालना जिल्ह्याच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात येणार आहे.

सदरील बैठकीस जालना महानगर जिल्ह्यातील सर्व जिल्हा पदाधिकारी, सदस्य, सर्व आघाडी पदाधिकारी सदस्य तसेच शहरातील (पान २ वर)

## जालना जिल्हा शाईन कराटे-डुच्या विद्यार्थ्यांनी गाठली यशाची नवी पायरीकराटे बेल्ट व प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात

**जालना -प्रतिनिधी**

जालना जिल्हा शाईन कराटे-डुच्या वतीने घेण्यात आलेल्या कराटे बेल्ट परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा कराटे बेल्ट व प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. विविध बेल्ट श्रेणींमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बेल्ट व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दैनिक युवा आदर्शचे संपादक दीपक शेळके होते. प्रमुख पाहुणे म्हणून व्यंकट राजू गुंडला आणि डॉ. प्रीती वैष्णव यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बेल्ट व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.कराटे हे केवळ आत्मसंरक्षणाचे साधन नसून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास, एकाग्रता, संयम आणि संकटांचा सामना करण्याची मानसिक ताकद निर्माण करणारे



प्रभावी माध्यम असल्याचे यावेळी मान्यवरांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी नियमित सराव, शिस्त आणि सातत्य कायम ठेवून क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्याचे आवाहनही करण्यात आले.विविध बेल्ट श्रेणींमध्ये विद्यार्थ्यांचे यशकराटे बेल्ट परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये ब्लॅक बेल्ट श्रेणीत कु. तन्वी खरटमल, कु. अश्विनी आजगे, कु. लावण्या गुडला, कु. दिव्यता कोठारी, कु. पूर्वा माने आणि कु. आरुषी वलकट्टी यांनी यश संपादन केले.

गोल्डन ब्राऊन बेल्ट श्रेणीत शेलमोन गुडेकर आणि नयन गोमती वाले यांनी यश मिळविले. ब्राऊन बेल्ट श्रेणीत कु. निवांशी वलकट्टी आणि ऋषिकेश श्रीराम यांचा समावेश आहे.ब्ल्यू बेल्ट सेकंड श्रेणीत कु. वैष्णवी लोखंडे, कु. अनुष्का म्हेत्रे आणि देवेंद्र चिंचपुरे यांनी यश मिळविले. तर ब्ल्यू बेल्ट फर्स्ट श्रेणीत कु. आकांक्षा चिल्का, कु. समीक्षा कर्रे, कु. आराध्या खत्ती, कु. वैष्णवी लुटे, कु. दिवेश कर्रे आणि ओंकार गुट्टे यांनी यश संपादन केले.ग्रीन बेल्ट सेकंड श्रेणीत मोहन झुंजुर, मल्हार पातुरकर आणि यशवर्धन चिल्का यांनी यश मिळविले. ग्रीन बेल्ट फर्स्ट श्रेणीत कु. तृप्ती उपरे, कु. आकाशी खर्डेकर, श्रीरुद्र लुटे, वेदांत मन्नद आणि अजित साळवे यांचा समावेश आहे.ऑरेंज बेल्ट श्रेणीत समर्थ डहाळे याने यश मिळविले. तर येलो बेल्ट श्रेणीत कु. स्नेहा काळुंके, कुशल वलकट्टी आणि प्रिन्स काळुंके यांनी यश संपादन केले.याशिवाय प्रेम गुल्लापेल्ली आणि शुभम नागरे या दोघांना कराटे ब्लॅक बेल्टचे प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान करून विशेष गौरव करण्यात आला.प्रशिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शनया सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना सेन्साई रुपेन्द्र गोपाल पारचा आणि सेन्साई अमन रुपेन्द्र पारचा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी कठोर सराव, नियमित प्रशिक्षण आणि प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनातून परीक्षेत यश मिळविले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अश्विनी आजगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सेन्साई रुपेन्द्र गोपाल पारचा यांनी केले.विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षावकराटे बेल्ट परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे श्री म.स्था. जैन प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती पोरवाल मॅडम, श्री म.स्था. जैन माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. वानगोता सर, नगरसेवक अक्षय गोरंट्याल, महावीरजी ढक्का, राजेशजी राऊत, संजय भगत, रितेश अग्रवाल, यादव बाबू , गणेश श्रीराम, नवीनकुमार वलकट्टी, गणेश लुटे तसेच पालकवर्गाने कौतुक केले.यशस्वी विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करून भविष्यातही कराटे क्षेत्रात सातत्याने प्रगती करावी, अशा शुभेच्छा मान्यवर व पालकांनी दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे त्यांच्या पालकांमध्ये आणि प्रशिक्षण केंद्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# संपादकीय...

## 'व्हिजन जालना' : चित्रफितीपलीकडे शहराला प्रत्यक्ष विकासाची गरज

नवे बोधचिन्ह, ड्रोन सर्वेक्षण आणि विकासाचे स्वप्न स्वागतार्ह; मात्र जालनेकरांना आता घोषणांपेक्षा रस्ते, पाणी, स्वच्छता आणि पारदर्शक प्रशासनाचे ठोस परिणाम हवे आहेत जालना महानगरपालिकेचा वर्धापन दिन यंदा केवळ औपचारिक कार्यक्रमापुरता मर्यादित न राहता विविध विकासाभिमुख उपक्रमांनी साजरा झाला, ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे. वृक्षारोपण, आरोग्य शिबिर, विद्यार्थ्यांचा गौरव, कर्मचाऱ्यांचा सन्मान, 'प्लास्टिकमुक्त जालना'चा संदेश, ड्रोनच्या माध्यमातून आधारित मालमत्ता सर्वेक्षण आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे 'व्हिजन जालना' या चित्रफितीतून शहराच्या भविष्यातील विकासाचे चित्र मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला. महापालिकेच्या नव्या बोधचिन्हाचे अनावरणही झाले. बदलत्या काळानुसार संस्थेची प्रतिमा आणि कार्यपद्धती बदलण्याची इच्छा यातून दिसते. परंतु कोणत्याही शहराचा विकास बोधचिन्ह बदलल्याने किंवा विकासाची चित्रफीत दाखवल्याने होत नाही; तो नागरिकांच्या दैनंदिन जीवनात जाणवणाऱ्या बदलातून सिद्ध होतो. त्यामुळे या वर्धापन दिनानिमित्त मांडण्यात आलेल्या 'व्हिजन जालना'ची खरी परीक्षा आता सुरू झाली आहे.

**चित्रफितीतील जालना प्रत्यक्षात कधी दिसणार?**

'व्हिजन जालना'मध्ये आधुनिक पायाभूत सुविधा, स्मार्ट नागरी सेवा, स्वच्छता, हरित उपक्रम, डिजिटल प्रशासन, वाहतूक सुधारणा आणि नागरिकाभिमुख विकासाचे चित्र उभे करण्यात आले आहे. हे स्वप्न आकर्षक आहे; परंतु जालनेकरांच्या मनात याचवेळी काही साधे प्रश्नही उभे राहतात. शहरातील पाणीपुरवठा सुरळीत कधी होणार? रस्त्यांची गुणवत्ता कधी सुधारणार? पावसाळ्यातील नाले आणि सांडपाणी व्यवस्थापनाचा प्रश्न कधी सुटणार? कचरा व्यवस्थापन कायमस्वरूपी कधी सुधारणार? वाहतूक कोंडी आणि पार्किंगचा प्रश्न कधी मार्गी लागणार? या प्रश्नांची उत्तरे मिळाल्याशिवाय 'व्हिजन जालना' पूर्ण झाले असे म्हणता येणार नाही. शहराच्या विकासाची खरी व्याख्या एखाद्या आकर्षक सादरीकरणात नसून नागरिकाला नळाला वेळेवर पाणी मिळणे, रस्त्यावर खड्डे नसणे, पावसाचे पाणी घरात न शिरणे, कचऱ्याचे नियमित संकलन होणे आणि महापालिकेच्या कार्यालयात कामासाठी नागरिकाला हेलपाटे मारावे न लागणे यात आहे. सर्वेक्षण : पारदर्शकतेची संधी की करभार वाढविण्याचे साधन? ड्रोनच्या माध्यमातून आधारित मालमत्ता फेरमूल्यांकन आणि नकाशांकनाचा शुभारंभ हा या वर्धापन दिनातील सर्वांत महत्त्वाचा प्रशासकीय उपक्रम मानावा लागेल.

शहरातील प्रत्येक मालमत्तेची अचूक डिजिटल नोंद, बांधकामाचे स्वरूप, मालमत्तेचे क्षेत्रफळ आणि करआकारणी याबाबत अचूक माहिती उपलब्ध झाली तर महापालिकेच्या करप्रणालीत मोठा बदल घडू शकतो. करचुकवेगिरी रोखता येईल, मालमत्तांची अद्ययावत नोंदणी होईल आणि महसूल वाढू शकतो.

मात्र इथेच प्रशासनाची खरी कसोटी आहे. सर्वेक्षणाचा उद्देश केवळ कर वाढविणे नसावा; करप्रणाली न्याय्य आणि पारदर्शक करणे हा त्याचा मुख्य हेतू असला पाहिजे. एखाद्या नागरिकाच्या मालमत्तेचे फेरमूल्यांकन झाले तर त्याला त्याची माहिती, सर्वेक्षणाचे निकष, आक्षेप नोंदविण्याची संधी आणि अपीलची प्रक्रिया सहज उपलब्ध झाली पाहिजे. महापालिकेचा महसूल वाढणे आवश्यक आहे; परंतु वाढीव महसुलाच्या बदल्यात नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा मिळाल्या पाहिजेत. कर वाढला आणि सुविधा मात्र त्याच राहिल्या, तर सर्वेक्षणाविषयी नागरिकांमध्ये अविश्वास निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# पान १ व ४ वरुन...

## 'गण गण गणात बोते'...

दर्शनासाठी महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुलांसह अनेक भाविक उपस्थित होते. पालखीचे दर्शन घेत भाविकांनी श्रींच्या चरणी पुष्पहार अर्पण करून मनोभावे प्रार्थना केली. पालखीचे आगमन होताच भाविकांनी 'गण गण गणात बोते', 'गजानन महाराज की जय' अशा जयघोषांनी परिसर दुमदुमून सोडला. टाळ-मृदंगाचा गजर, भक्तिगीते आणि जयघोषामुळे वातावरणात उत्साह निर्माण झाला होता.

अनेक भाविकांनी पालखीसमोर नतमस्तक होत दर्शन घेतले. श्रद्धा आणि भक्तीच्या वातावरणात पालखीचे स्वागत होत असताना उपस्थित भाविकांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. जालना महानगरपालिकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री गजानन महाराजांच्या पालखीचे स्वागत करण्यात आले. यावेळी महापौर वंदनाताई मगरे, उपमहापौर राजेश राऊत यांच्यासह महानगरपालिकेच्या विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पालखी स्वागतप्रसंगी कार्यालय अधीक्षक रंजना दांडेकर, सहायक आयुक्त विजय महाराज फुलंब्रीकर, विद्युत अभियंता कोमल गावंडे, निरीक्षक अरुण वानखेडे, श्रावण सराटे आणि किरण खानापुरे यांच्यासह महानगरपालिका प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

भाविकांसाठी मनपाची आवश्यक व्यवस्था पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर महानगरपालिका प्रशासनाकडून भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. पालखीच्या मार्गावर भाविकांची गर्दी लक्षात घेऊन संबंधित विभागांनी आवश्यक त्या बाबींची पाहणी केली. भाविकांना पालखीचे दर्शन घेताना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी महानगरपालिका प्रशासनातील विविध विभागांनी समन्वयाने काम केले. परिसरातील स्वच्छता, विद्युत व्यवस्था तसेच इतर आवश्यक बाबींवर प्रशासनाकडून लक्ष देण्यात आले. श्री गजानन महाराजांच्या पालखीचे जालना शहरात आगमन हा भाविकांसाठी श्रद्धेचा आणि आनंदाचा क्षण ठरला. पालखीच्या दर्शनासाठी झालेली गर्दी आणि भक्तिमय वातावरणातून नागरिकांची श्री गजानन महाराजांवरील श्रद्धा दिसून आली. पंढरपूरची आषाढी वारी पूर्ण करून शेगावकडे मार्गस्थ झालेल्या या पालखी सोहळ्यामुळे जालना शहरात काही काळ भक्तीमय वातावरण निर्माण झाले. जयघोष, टाळ-मृदंगाचा निनाद आणि भाविकांच्या उत्साहामुळे पालखी मार्गावरील परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. श्री गजानन महाराजांची पालखी पुढील प्रवासासाठी शेगावच्या दिशेने मार्गस्थ होत असताना भाविकांनी भक्तिभावाने निरोप दिला. 'गण गण गणात बोते'च्या अखंड जयघोषात पालखी सोहळ्याने जालना शहरातील भाविकांच्या मनात भक्ती आणि श्रद्धेची अनुभूती निर्माण केली.

## सामाजिक न्यायासाठी...

समाजातील व्यक्तींना आरक्षण देण्याच्या प्रक्रियेसाठी सुयोग्य शासन आदेश व कार्यपद्धती जाहीर करावी, या प्रमुख मागणीसाठी आंदोलन करण्यात येणार होते. मात्र आंदोलन सुरू होण्यापूर्वीच दातेपाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर पोलिसांकडून कारवाई करण्यात आल्याचा दावा डॉ. लाखेपाटील यांनी केला आहे.

**'आंदोलन सुरू होण्यापूर्वीच ताब्यात घेणे निषेधार्ह'**

डॉ. लाखेपाटील यांनी म्हटले आहे की, सामाजिक आणि घटनात्मक प्रश्नांवर शांततापूर्ण पद्धतीने आंदोलन करण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. अशा आंदोलनासाठी कार्यकर्ते एकत्र येण्यापूर्वीच त्यांना ताब्यात घेण्याची कारवाई करणे ही दडपशाही असल्याचा आरोप त्यांनी केला. राजेंद्र दातेपाटील हे मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर दीर्घकाळ अभ्यास आणि कायदेशीर लढा देणारे कार्यकर्ते असल्याचा दावा करत, अशा व्यक्तीला आंदोलन करण्यापासून रोखणे योग्य नाही, असेही त्यांनी म्हटले आहे.

**हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीवर आक्षेप**

हैदराबाद संस्थानातील कुणबी पुरावे नसलेल्या मराठा समाजातील व्यक्तींना आरक्षण देण्यासंदर्भातील शासनाच्या निर्णय व कार्यपद्धतीवरही डॉ. लाखेपाटील यांनी आक्षेप नोंदवला आहे.

त्यांच्या म्हणण्यानुसार, २ सप्टेंबर २०२५ रोजीच्या हैदराबाद गॅझेटसंदर्भातील शासन आदेश आणि त्याच्या अंमलबजावणीसाठी विभागीय महसूल आयुक्तांनी जाहीर केलेली कार्यपद्धती याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या प्रक्रियेत संविधानिक व कायदेशीर दुरुस्तीची आवश्यकता असल्याची भूमिका राजेंद्र दातेपाटील यांनी घेतली असल्याचे डॉ. लाखेपाटील यांनी सांगितले. या मागण्यांसाठीच दातेपाटील यांनी आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र उपोषणाला सुरुवात करण्यापूर्वीच त्यांना ताब्यात घेण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**'कायदेशीर मागणी करणारे आंदोलन दडपले जात आहे'**

डॉ. लाखेपाटील यांनी सरकारच्या भूमिकेवरही गंभीर प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या आरोपानुसार, मराठा समाजाच्या आरक्षणाच्या घटनात्मक आणि कायदेशीर मागण्यांपेक्षा अन्य स्वरूपाच्या मागण्या करणाऱ्या आंदोलनांना प्रोत्साहन दिले जात आहे; मात्र घटनात्मक व कायदेशीर चौकटीत मागणी करणाऱ्या आंदोलनांवर कारवाई केली जात आहे. अशा प्रकारची भूमिका सामाजिक न्यायाच्या दृष्टीने योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. सरकारने विविध सामाजिक प्रश्नांवरील आंदोलनांकडे समान दृष्टीने पाहावे आणि शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या नागरिकांना त्यांचा घटनात्मक अधिकार बजावण्याची संधी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

**'सामाजिक तणाव निर्माण करणाऱ्या आंदोलनांना पाठिंबा?'**

राज्यातील सामाजिक वातावरणाबाबतही डॉ. लाखेपाटील यांनी चिंता व्यक्त केली. त्यांच्या आरोपानुसार, मराठा समाजाच्या आरक्षणाची घटनात्मक आणि कायदेशीर मागणी न करणाऱ्या काही आंदोलनांना सरकारकडून पाठिंबा दिला जात आहे. अशा आंदोलनांमुळे जाती-जातींमध्ये संघर्ष निर्माण होण्याची, सामाजिक सलोखा बिघडण्याची आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी आणि कामगारांमध्येही तणाव निर्माण होऊ शकतो, असे ते म्हणाले.

मात्र, हे आरोप संबंधित सरकार किंवा प्रशासनाच्या अधिकृत भूमिकेचे प्रतिनिधित्व करत नसून डॉ. लाखेपाटील यांनी व्यक्त केलेली भूमिका असल्याचे स्पष्ट आहे.

**सरकारने भूमिका स्पष्ट करण्याची मागणी**

राज्यात सामाजिक न्याय, आरक्षण आणि विविध समाजांच्या मागण्यांवर आंदोलने होत असताना सरकारने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी डॉ. लाखेपाटील यांनी केली आहे. शांततापूर्ण आंदोलन, उपोषण आणि संविधानिक मार्गाने मागण्या मांडणाऱ्या आंदोलकांबाबत सरकार व प्रशासनाची नेमकी भूमिका काय आहे, हे जाहीर करावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच राजेंद्र दातेपाटील यांच्यासह आंदोलनात सहभागी होणाऱ्या कार्यकर्त्यांवर करण्यात आलेल्या कारवाईचा पुनर्विचार करावा आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांवर चर्चा व कायदेशीर मार्गाने तोडगा काढण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

**आरक्षणाच्या प्रश्नावर पुन्हा संघर्षाची चिन्हे**

मराठा आरक्षणाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय पटलावर चर्चेचा केंद्रबिंदू राहिला आहे. आरक्षणाची अंमलबजावणी, कुणबी नोंदी, हैदराबाद संस्थानाशी संबंधित दस्तऐवज आणि त्यावर आधारित प्रमाणपत्र प्रक्रिया यावरून विविध मराठा संघटनांकडून वेगवेगळ्या भूमिका मांडल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर राजेंद्र दातेपाटील यांच्या प्रस्तावित आंदोलनापूर्वी झालेल्या पोलिस कारवाईवरून पुन्हा एकदा आंदोलनाचा अधिकार, प्रशासनाची भूमिका आणि मराठा आरक्षणाच्या कायदेशीर प्रक्रियेवर चर्चा सुरू झाली आहे.

## जलसंधारणाच्या...

अँकर करण सिंह पवार, अँकर लागवी ओम सावंत, लोकशाही मराठीचे रिपोर्टर सुधाकर जाधव यांच्यासह भाऊसाहेब घुगे यांचे सहकारी प्रवीण फुके पाटील, राजीव पाटील, वायाळ, रामेश्वर दराडे आदी मान्यवर उपस्थित होते. भाऊसाहेब घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली नाम फाउंडेशन व नाथ फाउंडेशनच्या माध्यमातून जालना जिल्ह्यातील विविध गावांमध्ये नदी-नाले खोलीकरण व रुंदीकरणाची कामे करण्यात आली आहेत. विशेषतः भोर्डी नदीच्या पुनर्जीवनामुळे परिसरातील शेतीसह पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणात जलसाठा उपलब्ध होण्यास मदत झाली आहे. या कामांमुळे गावांच्या पाणी उपलब्धतेत सकारात्मक बदल झाला असून शेतीला चालना मिळण्याबरोबरच भूजल पातळीतही सुधारणा झाली आहे. जलसंधारणाबरोबरच मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून त्यांचे संगोपन करण्याचे कामही करण्यात आले आहे. जलसंधारण आणि पर्यावरण संवर्धनाच्या माध्यमातून समाजहितासाठी केलेल्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत लोकशाही मराठी न्यूज चॅनलच्या वतीने भाऊसाहेब घुगे यांचा 'जलक्रांती योद्धा' पुरस्काराने गौरव करण्यात आला. पुरस्काराबद्दल भाऊसाहेब घुगे यांनी मराठी न्यूज चॅनलचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

## जालना रेशिम उद्योगाला...

इमारत व बाजारपेठेच्या बांधकामासाठी सहा कोटी रुपये मंजूर करून घेत प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली होती. आता बाजारपेठेची इमारत पूर्ण झाली असून स्वतःच्या मालकीच्या जागेत रेशिम बाजारपेठ सुरू होत आहे. त्यामुळे माझे स्वप्न पूर्ण होत असल्याचा मला आनंद आहे,'' असे त्यांनी सांगितले. जालना जिल्ह्यात रेशिम उत्पादनाला मोठी क्षमता असून, उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य बाजारपेठ उपलब्ध होणे ही या उद्योगाच्या वाढीसाठी महत्त्वाची बाब आहे. याच उद्देशाने जालना येथे रेशिम बाजारपेठ उभारण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे खोतकर यांनी सांगितले. रामनगरचा प्रवास थांबणार; शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचणार जालना जिल्ह्यातील अनेक शेतकरी रेशिम उत्पादनाकडे वळले असले तरी रेशिम विक्रीसाठी स्थानिक पातळीवर सक्षम बाजारपेठ उपलब्ध नसल्याने त्यांना माल विक्रीसाठी कर्नाटकातील बंगळुरूजवळील रामनगर येथे जावे लागत होते. या प्रवासामुळे शेतकऱ्यांचा वेळ, वाहतूक खर्च आणि श्रम मोठ्या प्रमाणावर खर्च होत होते. ही अडचण लक्षात घेऊन जालना येथेच रेशिम उत्पादक शेतकऱ्यांसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. स्थानिक बाजारपेठ उपलब्ध झाल्याने रेशिम उत्पादकांना आपल्या मालाची विक्री करण्यासाठी दूरच्या बाजारपेठांवर अवलंबून राहण्याची गरज कमी होणार आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीतून सुरुवात; आता स्वतंत्र बाजारपेठ

स्वतंत्र रेशिम बाजारपेठ उभारण्याची प्रक्रिया सुरू असतानाच जालना कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये रेशिम खरेदीची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा मिळाला. जालना येथेच रेशिम खरेदीची सुविधा उपलब्ध झाल्याने रेशिम उत्पादक शेतकऱ्यांचा प्रतिसाद वाढला आणि जिल्ह्यात रेशिम उत्पादनाला चालना मिळू लागली. आता स्वतंत्र आणि प्रशस्त रेशिम बाजारपेठ उपलब्ध होत असल्याने रेशिम उत्पादकांसाठी ही व्यवस्था अधिक सक्षम होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांसाठी बाजारपेठेसोबत निवासाचीही सुविधा

नवीन रेशिम बाजारपेठेच्या इमारतीमध्ये रेशिम खरेदी-विक्रीसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, दूरवरून रेशिम विक्रीसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये, यासाठी निवासाची व्यवस्था करण्यात आली असून आठ खोल्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

त्यामुळे जालना जिल्ह्यासह परिसरातील रेशिम उत्पादक शेतकऱ्यांना माल विक्रीसाठी जालना येथे आल्यानंतर निवासाचीही सोय उपलब्ध होणार आहे. बाजारपेठ, खरेदी-विक्री व्यवस्था आणि निवासाची सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांच्या दृष्टीने ही बाजारपेठ अधिक उपयुक्त ठरणार आहे.

**रेशिम उद्योगाला मिळणार नवी दिशा**

जालना जिल्ह्यात रेशिम उत्पादनाचा विस्तार होत असताना उत्पादित मालाला स्थानिक पातळीवर बाजारपेठ मिळणे आवश्यक आहे. स्वतंत्र रेशिम बाजारपेठ सुरू झाल्यानंतर जिल्ह्यातील रेशिम उत्पादक शेतकऱ्यांना अधिक सुलभ पद्धतीने मालाची विक्री करता येणार आहे. स्थानिक बाजारपेठेमुळे रेशिम उत्पादनाशी संबंधित आर्थिक व्यवहारांना चालना मिळण्यासोबतच शेतकऱ्यांना उत्पादन वाढविण्यासाठी प्रोत्साहन मिळण्याची शक्यता आहे. परिणामी जालना जिल्ह्यातील रेशिम उद्योगाला अधिक संघटित आणि व्यापक स्वरूप प्राप्त होण्यास मदत होऊ शकते.

**अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना**

उद्घाटन कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा आढावा घेताना आ. खोतकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होणारा उद्घाटन सोहळा यशस्वी, शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश त्यांनी दिले. कार्यक्रमस्थळी येणाऱ्या शेतकरी, नागरिक आणि मान्यवरांसाठी आवश्यक सुविधा, वाहतूक व्यवस्था, परिसराची स्वच्छता, बैठक व्यवस्था तसेच इतर प्रशासकीय बाबींची त्यांनी माहिती घेतली.

**अधिकारी व शिवसेना पदाधिकाऱ्यांची उपस्थिती**

यावेळी युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर, जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, जिल्हा रेशिम अधिकारी मोहिते, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता कोल्हे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कापसे, तहसीलदार राजू निहाळ, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते, माजी सभापती पांडुरंग डोंगरे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

तसेच उपजिल्हाप्रमुख लक्ष्मण आप्पा अवघड, माजी सभापती गोपीकिशन गोगडे, पंचायत समिती सदस्य जनार्दन चौधरी, सरपंच रवींद्र ढगे, बालाजी पवार, किशोर विटेकर यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**शेतकऱ्यांसाठी 'हक्काची बाजारपेठ'**

जालना येथे रेशिम बाजारपेठ सुरू होणे हे केवळ एका इमारतीचे उद्घाटन नसून, जिल्ह्यातील रेशिम उत्पादक शेतकऱ्यांसाठी स्थानिक पातळीवर हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. आतापर्यंत दूरच्या बाजारपेठांवर अवलंबून असलेल्या उत्पादकांना आता जालन्यातच माल विक्रीची सुविधा मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ वाचण्याबरोबरच वाहतूक व इतर अनुषंगिक खर्चातही बचत होण्याची अपेक्षा आहे. स्वतंत्र बाजारपेठेमुळे जालना जिल्ह्यातील रेशिम उत्पादनाला अधिक चालना मिळून रेशिम उद्योगाला नव्या उंचीवर नेण्यासाठी ही बाजारपेठ महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## भारतीय जनता...

सर्व नगरसेवक, माजी नगरसेवक, माजी पदाधिकारी, सरपंच, चेअरमन इत्यादीसह कार्यकर्ता बंधू भगिनी यांनी बैठकीस आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केले आहे.

## हैदराबाद गॅझेट'च्या...

५ हजार कोटी रुपये निधी द्यावा, संशोधनासाठी महिलांची वयोमर्यादा ५० वर्षे करावी तसेच अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला १० हजार कोटी रुपये निधी द्यावा, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत. याशिवाय प्रलंबित नियुक्त्या तातडीने द्याव्यात आणि कायगाव येथे शहीद काकासाहेब शिंदे यांच्या स्मरणार्थ मराठा हुतात्मा स्मारक उभारावे, अशी मागणीही मोर्चाने केली आहे. दरम्यान, मराठा समाजाच्या मागण्यांसंदर्भात विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्यासोबत समन्वयकांची बैठक झाली. ९ ऑगस्टचे उपोषण करू नये, मागण्या तातडीने शासनाकडे पाठविण्यात येतील तसेच ११ ऑगस्ट रोजी मराठा आरक्षण विषयक उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यासोबत विभागीय बैठक होणार असल्याचे आयुक्तांनी सांगितल्याची माहिती मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. मात्र, आरक्षणाच्या प्रश्नावर स्पष्ट शासन आदेश आणि ठोस कार्यपद्धती जाहीर होईपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे आगामी बैठकीत शासन काय भूमिका घेते आणि हैदराबाद गॅझेटच्या अंमलबजावणीबाबत कोणता निर्णय घेतला जातो, याकडे मराठा समाजाचे लक्ष लागले आहे.

## ॲग्रोव्हिजन गटशेती...

माध्यमातून शेतकऱ्यांना नवनवीन प्रयोग, बाजारपेठ, शेतीतील संधी आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याबाबत मार्गदर्शन मिळत आहे.

या चर्चासत्रास भानुदासराव डोईफोडे, नंदकिशोर देशमुख, सुधीर जोशी, दत्तात्रय सवडे, डिगांबर सवडे, जनार्धन सवडे, गणेश जाधव, विलास सवडे, योगेश सवडे, पांडुरंग सवडे, संतोष सवडे, देविदास सवडे, सौ. लक्ष्मीबाई सवडे, उषाबाई भारती, भुजंगराव सवडे, मोरेश्वर सवडे, यश जाधव यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

## टेंभुर्णी येथील...

पादचाऱ्यांवर आणि दुचाकीस्वारांवर धावून जाण्याच्या घटना घडल्या आहेत. रात्रीच्या वेळी तर परिस्थिती अधिकच गंभीर होते. १० ते १५ कुत्र्यांच्या झुंडी रस्त्याच्या मधोमध ठाण मांडून बसत असल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. कुत्रे अंगावर धावून आल्यामुळे दुचाकी घसरून किरकोळ अपघात होण्याचे प्रमाणही वाढले आहे. उघड्यावरील कचरा आणि हॉटेलचे अवशेष प्रमुख कारणपरिसरातील हॉटेल, चिकन-मटण दुकानांचे उघड्यावर टाकले जाणारे अन्न आणि कचरा कुंड्यांच्या आजूबाजूला पडणारे अवशेष यामुळे या भागात कुत्र्यांचा वावर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. शेजारच्या जालना शहरात वर्षभरात शेकडो नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटना ताज्या असतानाच, आता ग्रामीण भागातही ही दहशत पसरत चालली आहे.

## शिक्षणासोबत कौशल्य...

शेळीपालन,कुक्कुटपालन, गाय-म्हैस पालन व दुग्ध व्यवसायावर आधारित तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.दि. ८ ते १० ऑगस्ट दरम्यान होणाऱ्या या प्रशिक्षणाचे आयोजन प्रा.राजू विजय छल्लारे यांनी केले आहे.

यावेळी बोलताना प्रा.डॉ.आगे यांनी शेतीतील माती परीक्षणाचे महत्त्व सांगितले.माती परीक्षणाअभावी पिकांच्या उत्पादनावर परिणाम होत असल्याने शेतकऱ्यांनी माती परीक्षण करून शेतीचे नियोजन करावे.तसेच शेतीला कुक्कुटपालन,पशुपालन यांसारख्या जोडव्यवसायांची जोड दिल्यास उत्पन्न वाढण्यास मदत होईल,असे त्यांनी सांगितले.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश काळे यांनी शेतकऱ्यांनी शेतीशी निगडित व्यवसाय सुरू करून आर्थिक सक्षम होण्याचे आवाहन केले.छोट्या व्यवसायापासून सुरुवात करून अनुभवाच्या जोरावर त्याचा विस्तार करता येतो.शेती आणि कृषीपूरक उद्योगांची सांगड घातल्याशिवाय ग्रामीण भागात आर्थिक क्रांती होणार नाही,असे त्यांनी नमूद केले.

एम.सी.ई.डी.चे प्रकल्प अधिकारी विनोद तुपे यांनी विविध शासकीय योजनांची माहिती देत त्यासाठी आवश्यक कागदपत्रे,प्रक्रिया आणि बँकिंगविषयक बाबींवर मार्गदर्शन केले.पशुपालन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी एम.सी.ई.डी.च्या माध्यमातून आवश्यक सहकार्य करण्यात येईल,असे त्यांनी सांगितले.

प्रशिक्षणाचे आयोजक प्रा.आर.व्ही.छल्लारे यांनी ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांना शिक्षणासोबत कौशल्य प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगारासाठी सक्षम करणे हा उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे सांगितले.पशुपालन व्यवसायाच्या माध्यमातून ग्रामीण तरुण व शेतकऱ्यांना आर्थिक स्वावलंबनाची नवी संधी उपलब्ध होऊ शकते.या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गजानन आढे यांनी पशुपालन व्यवसायासाठी उपलब्ध शासकीय योजनांची माहिती दिली.तर मार्गदर्शक विष्णू पिवळ यांनी शेतीसोबत पशुपालन हा प्रभावी जोडव्यवसाय असल्याचे सांगत पशुपालन व्यवसायातील विविध बाबींवर मार्गदर्शन केले.

यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आश्रमचे बप्पासाहेब काळे,जिल्हा अध्यक्ष सुरेश काळे,प्रहारचे तालुका अध्यक्ष राम ठाकूर,शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख बंटी आटोळे,भाजप युवा नेते ॲड राजेंद्र पवार,आश्रमाचे अधीक्षक संभाजी काळे, एम.सी.ई.डी.प्रकल्प अधिकारी विनोद तुपे,सूर्यवंशी सर,डॉ.हनुमंत आगे,पत्रकार रोहित पवार,रवींद्र घाडगे,म मुकेश डूचे,मार्गदर्शक विष्णू पिवळ,गजानन आढे,कार्यक्रम समन्वयक कैलास भाबट यांच्यासह पंचक्रोशीतील शेतकरी,तरुण व शेकडो प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## घनसावंगी तालुका...

तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवणे आणि पक्षाची ध्येय-धोरणे राबवून शिवसेना पक्षवाढीसाठी सर्वांना सोबत घेऊन कार्य कराल,असा विश्वास यावेळी पक्षाच्या वतीने व्यक्त करण्यात आला.सदर नियुक्तीचा कालावधी १ वर्षाचा असणार आहे.

भाऊसाहेब जाधव यांच्या निवडीबद्दल तालुक्यातील पक्ष पदाधिकारी,कार्यकर्ते आणि नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## कत्तलीविरोधात...

कत्तलखान्यांसोबतच महापालिकेच्या दिशेनेही वळवायला हवा आणि प्रशासनाला जाब विचारायला हवा. अन्यथा हे तथाकथित गोरक्षण केवळ दिखाव्यापुरते राहील.''

गोरक्षणाच्या नावाखाली होणारे आंदोलन आणि प्रत्यक्षातील गोवंशाची होणारी परवड यामधील ही तफावत आता शहरातील जागरूक नागरिकांच्या चर्चेचा विषय बनली आहे. कालीकुर्ती परिसरातील कचरा डेपो तातडीने हटवून शहरात ठोस कचरा व्यवस्थापन प्रणाली राबवावी आणि गोवंशाच्या सुरक्षिततेसाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. अन्यथा गोरक्षणाच्या घोषणा केवळ कागदावरच राहतील आणि प्लास्टिक खाऊन गायींचा जीव जाण्याचे सत्र असेच सुरू राहील, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

## नांदखेडा, किन्ही...

अवचितराव जाधव, ग्रामपंचायत अधिकारी एम. आर. डोईफोडे, बाबासाहेब सवडे, सरपंच शिराळा पांडुरंग दुनगहु, पंढरीनाथ म्हस्के मनसे तालुका सरचिटणीस, दिलीपराव सवडे, विलास सवडे, सतीश सवडे, दीपक माळी, संतोष खरात, दीपक माळी, संतोष जंजाळ, ज्ञानेश्वर पवार, रतन पवार, अशोक सवडे, गजानन पवार ज्ञानेश्वर सवडे, कल्याण सवडे,यांच्यासह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाच्या प्रती आमदार संतोष पाटील दानवे, तहसीलदार, जाफ्राबाद तसेच उपकार्यकारी अभियंता, टेंभुर्णी यांनाही देण्यात आल्या आहेत.





काही दिवसातच गणपती बाप्पाचे आगमन होणार यानिमित्ताने गणपतीची रंगरंगोटी करताना संत्रे बंधू दिसत आहे छायाचित्र किरण खानापुरे

# उत्पन्न कर विवरणपत्र अपघाती भरपाईसाठी अनिवार्य पुरावा; नुकसानभरपाई १४ लाखांवरून थेट ५१ लाखांवर!

**जालना - प्रतिनिधी**

रस्ते अपघातातील मृताच्या कुटुंबाला योग्य आणि रास्त भरपाई मिळवून देण्यासाठी आयटीआर ( ) हा अत्यंत महत्त्वाचा आणि कायदेशीर दस्तऐवज आहे. जर आयटीआरमध्ये कोणताही बनावटपणा किंवा फेरफार सिद्ध झाला नसेल, तर दावा प्राधिकरणाला तो पुरावा म्हणून नाकारता येणार नाही, असा अत्यंत महत्त्वपूर्ण आणि कायदेशीर पायंडा पाडणारा निकाल छत्तीसगड उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती संजय के. अग्रवाल यांच्या एकलपीठाने हा ऐतिहासिक निर्णय देताना, रायपूरच्या दावा प्राधिकरणाचा निर्णय सुधारून पीडित वर्मा कुटुंबाला तब्बल ५१ लाख २४ हजार ९८० रुपयांची सुधारित नुकसानभरपाई मंजूर केली आहे.

हे प्रकरण रायपूर जिल्ह्यातील नेओरा परिसरातील तुळशी गावचे रहिवासी गजाधर वर्मा यांच्या अपघाती निधनाशी संबंधित आहे. मृताची पत्नी गुलाब वर्मा, दोन लहान मुले आणि वृद्ध आई यांनी रायपूर येथील ५ व्या अतिरिक्त मोटार अपघात दावा प्राधिकरणाकडे दाद मागितली होती. प्राधिकरणाने मृत व्यक्तीची मासिक कमाई केवळ ७,००० रुपये गृहीत धरून १४ लाख ८ हजार रुपयांची भरपाई जाहीर केली होती. प्राधिकरणाचा हा निर्णय अयोग्य असल्याचे सांगत पीडित कुटुंबाने नुकसानभरपाई वाढवण्यासाठी उच्च न्यायालयात ( १६२/२०२०) अपील दाखल केले होते. उच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान दिसून आले की, अर्जदारांनी मृत गजाधर वर्मा यांचे २०११-१२ ते २०१३-१४ या वर्षांचे आयटीआर न्यायालयात सादर केले होते, ज्यानुसार त्यांचे वार्षिक उत्पन्न रु. ३,५७,२४५ इतके होते. परंतु, प्राधिकरणाने ''उत्पन्न हे केवळ अंदाजावर आधारित आहे'' असा शेरा मारत हे आयटीआर अयोग्यरीत्या फेटाळले होते. यावर न्यायमूर्ती संजय के. अग्रवाल यांनी स्पष्ट केले की, आयटीआर हा कायदेशीर पुरावा असून अपघाती दाव्यांमध्ये भरपाई निश्चित करण्यासाठी तो गृहीत धरणे बंधनकारक आहे. यानुसार उच्च न्यायालयाने मूळ नुकसानभरपाईच्या रक्कमेत ३७ लाख १६ हजार ९८० रुपयांची भरघोस वाढ करत एकूण ५१,२४,९८० रुपये ७% व्याजासह देण्याचे आदेश विमा कंपनीला दिले आहेत.

या महत्त्वपूर्ण निकालाचे विश्लेषण करताना ॲड. महेश एस. धननावत यांनी आपले विशेष वक्तव्य नोंदवले:

' 'छत्तीसगड उच्च न्यायालयाचा हा निर्णय मोटार अपघात प्रकरणी न्यायाची वाट पाहणाऱ्या हजारो पीडित कुटुंबांसाठी अत्यंत क्रांतिकारक आणि मार्गदर्शक ठरेल. अनेकदा अपघाती क्लेम प्रकरणांमध्ये कनिष्ठ न्यायालये किंवा प्राधिकरणे आयटीआरमधील उत्पन्नाकडे दुर्लक्ष करतात किंवा ते केवळ अंदाज मानून फेटाळतात, ज्यामुळे पीडितांवर मोठा अन्याय होतो. परंतु, उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, जर आयटीआर कायदेशीररीत्या सादर केले असेल तर भरपाई निश्चित करण्यासाठी ते अनिवार्य दस्तऐवज मानले गेले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाच्या प्रणय सेठी व सरला वर्मा प्रकरणांतील तत्त्वांचा आधार घेत न्यायालयाने दिलेल्या या निर्णयामुळे करदात्या नागरिकांच्या वारसांना योग्य आणि न्याय्य भरपाई मिळण्याचा मार्ग अधिक सुकर झाला आहे.''

उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे विमा कंपनीचे अपील फेटाळले गेले असून, प्राधिकरणांना आयटीआरच्या आधारे वास्तववादी भरपाई निश्चित करण्याचे स्पष्ट निर्देश मिळाले आहेत. या निर्णयामुळे अपघाती प्रकरणी कायदेशीर मार्गाने कर भरणाऱ्या नागरिकांच्या कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## आधुनिक युगात शिक्षण हेच प्रगतीचे मुख्य साधन

### जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी समाज विकास मंचातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व मिठाई वाटप

**जालना । प्रतिनिधी**

आधुनिक युगात समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हेच सर्वात प्रभावी साधन असून, आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून प्रगतीची नवी शिखरे गाठावीत, असे आवाहन आदिवासी समाज विकास मंचाचे संस्थापक गोकुळ स्वामी यांनी केले.

जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी समाज विकास मंच, जालना यांच्या वतीने रविवारी (दि. ९ ऑगस्ट) मराठी कन्या पाठशाळेत विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व मिठाईचे वाटप करून त्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ समाजसेवक बाबासाहेब वानखेडे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव देशमुख होते. उपस्थित मान्यवरांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवून चांगले यश संपादन करावे आणि आपल्या कुटुंबासह समाजाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन मान्यवरांनी केले. आर्थिक किंवा सामाजिक अडचणींवर मात करून विद्यार्थ्यांनी शिक्षणाला प्राधान्य द्यावे, असा संदेशही यावेळी देण्यात आला. प्रास्ताविक करताना आदिवासी समाज विकास मंचाचे संस्थापक गोकुळ स्वामी यांनी गेल्या चार वर्षांपासून राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, पूर्वीच्या काळात आदिवासी समाजाला आपल्या हक्कांसाठी संघर्ष करावा लागला. त्या संघर्षात शस्त्रांचा वापरही करण्यात आला; मात्र आजचे युग बदलले आहे. आधुनिक समाजव्यवस्थेत आपल्या हक्कांसाठी आणि प्रगतीसाठी शिक्षण हेच सर्वात प्रभावी माध्यम आहे. ''आजच्या आधुनिक युगात आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या हातात शस्त्रांसोबतच पेन असणे अधिक गरजेचे आहे. शिक्षणाच्या माध्यमातूनच समाजाची आर्थिक, सामाजिक आणि बौद्धिक प्रगती साधता येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे गांभीर्याने पाहून उच्च शिक्षण घेण्याचा संकल्प करावा,'' असा संदेश गोकुळ स्वामी यांनी दिला.

गेल्या चार वर्षांपासून मंचाच्या माध्यमातून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम राबविला जात असल्याचेही त्यांनी सांगितले. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याच्या शिक्षणात अडथळा निर्माण होऊ नये, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. मिठाई वाटप करून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव केल्याने इतर विद्यार्थ्यांनाही अभ्यासात चांगली कामगिरी करण्यासाठी प्रेरणा मिळते. समाजातील आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम या उपक्रमातून होत असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले. जागतिक आदिवासी दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतीसूर्य बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी आणि स्वाभिमानासाठी संघर्ष करणाऱ्या बिरसा मुंडा यांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

आदिवासी समाजातील नव्या पिढीने शिक्षण, कौशल्य आणि आधुनिक ज्ञानाच्या माध्यमातून स्वतःचे भविष्य घडवावे, तसेच समाजाच्या विकासात योगदान द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या कार्यक्रमाला समाजसेवक सय्यद करीम, माळी महासंघाचे कैलास रसाळ, शेख जमीर, मझहर सौदागर, सचिन टापरे, संतोष गायकवाड, सौ. साधना मोरे, सौ. करुणा साळवे, सौ. कामिनी पोलागट्टी, सौ. सुकन्या स्वामी, सतीश नाटेकर, रजनीकांत शडल्लू, अंगत टापरे, नरेश इंदुले, ज्ञानेश्वर इंदुले, सचिन आनंदे, अमित शडमल्लू आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या आयोजनासाठी मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा गौरव आणि शैक्षणिक साहित्य वाटपामुळे कार्यक्रमाला उत्साही प्रतिसाद मिळाला.

## परतूर तालुक्यातील सिंगोना शालेय व्यवस्थापन समिती गठित

**परतूर - प्रतिनिधी**

जि. प.प्रा.शा. सिंगोना शालेय व्यवस्थापन समिती गठित करण्यात आली.शालये समितीच्या अध्यक्ष पदी प्रल्हाद नारायण कदम यांची सर्वानुमते निवड व श्रीमती स्वाती राजेश गरड यांची उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे.

या

बैठकीत पालकवर्ग, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक वर्ग, ग्रामसेवक, पत्रकार बंधू तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक यांच्या उपस्थितीत सर्वांनी एकमताने निर्णय घेत शालेय समिती गठित केली आहे. यावेळी शिक्षकांची, आणि मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, उपस्थित होते. केंद्रप्रमुख



बाबासाहेब तरवटे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले शालेय व्यवस्थापन समितीचे कार्य , कर्तव्य, आणि तत्वे हे बैठकीत उपस्थित सर्वांना समजावून सांगितले. याप्रसंगी गावचे पोलीस पाटील, नंदकिशोर गरड.

मुंजाजी मुळे.लक्ष्मण सोळंके. श्रीमती सुनिता हरिभाऊ सोळंके. श्रीमती रुपाली जयराम लांडगे. राजेश गरड. अच्युत गरड. नितीन गरड. राजाराम गरड.विजय सोनपसारे. निळकंठ मेहत्रे. ज्ञानेश्वर मांटे. विश्वनाथ सोनपसारे. राम कदम. विद्यार्थी प्रतिनिधी कु. प्रकाश गौतम भाग्यवंत,कु.आयुश्री शरद सोळंके या सर्व सदस्यांची बिनविरोध निवड करण्यात आली.यासर्व व्यवस्थापन समितीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## टेंभुर्णीत भक्तीमय हरिनाम सप्ताह ४२ वर्षाची परंपरा

**दत्ता देशमुख**

संत शिरोमणी सावता महाराज व नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त टेंभुर्णी येथे मंगळवारपासून अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे मागील ४२ वर्षापासून अखंडपणे सुरू असलेल्या या सोहळ्यामध्ये यावर्षी साक्षी ताई अपार निवृत्ती महाराज कोरडे दत्तात्रय महाराज अंकुश कर मनोज महाराज भाग्यवंत दत्तात्रय महाराज भुंबर राम महाराज काळे बाळासाहेब महाराज पवार यांचे हरिकीर्तन होणार आहेत तर मंगळवारी (ता. ११) महंत महादेव महाराज गिरी यांचे काल्याचे किर्तन होणार आहे . याशिवाय दररोज सकाळी काकड आरती भजन विष्णुसहस्रनाम ज्ञानेश्वरी पारायण सोहळा गाथा भजन सावता महाराज चरित्र पठण हरिपाठ व हरिकीर्तनाच्या नियमित कार्यक्रमाचे आयोजन असून दिगंबर महाराज



कदम ज्ञानेश्वरी पारायणाची व्यासपीठ करणार आहेत. सोहळ्यामध्ये कृष्णा महाराज तपोवन कर रमेश महाराज लोणगावकर मुकुंद महाराज अकोला देव विठ्ठल महाराज कापसे शंकर महाराज पिंपळे ज्ञानेश्वर महाराज जाधव ही गायक वादक मंडळी सहभागी होणार आहे. या सोहळ्याचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# हाच संवाद मोहनजी भागवतांनी आंदोलनाच्या एक-दोन दिवसांच्यादरम्यान साधला असता तर ;कदाचित सरकारला जाग आली असती!

सरसंघचालक मोहनजी भागवत यांनी जेन-झी सोबत संवाद साधला याचे स्वागत;हेच काम सरकारने वेळेच्या आधी विद्यार्थ्यांसोबत केले असते तर जेन-झीला एवढ्या जखमा झाल्या नसत्या. मोहन भागवतांनी जेन-झीवर विश्वास दाखविला ही चांगली गोष्ट आहे. परंतु प्रधानमंत्री यांना परिसीमन बिलाकरीता बहुमताच्या निमित्ताने पक्ष फोडून एनडीएमध्ये सहभागी झालेल्या खासदारांसोबत चर्चा करण्यास वेळ मिळाली; अशाप्रकारे जेन-झी सोबत वेळेच्या आधीच चर्चा करण्यास वेळ का मिळाली नाही?असे अनेक प्रश्न आज विद्यार्थ्यांसमोर उपस्थित होत आहेत. सरसंघचालक मोहनजी भागवत यांनी जेन-झीवर पूर्ण विश्वास करत ते म्हणतात की, विद्यार्थ्यांना चांगल्या व्येवस्थेसाठी आंदोलन करण्याचा पूर्ण अधिकार आहे आणि मी त्याचे समर्थन करतो असे जेन-झी सोबत संवाद साधताना त्यांनी म्हटले याचे मनापासून स्वागत.परंतु कोणताही राजकीय हेतू न बाळगता ज्या विद्यार्थ्यांनी सीजेपीच्या अंतर्गत आपल्या मागण्यांच्या संदर्भात आंदोलन दिनांक २० जूनला सुरू केले ते १९ जुलै पर्यंत शांततेत चालले या ३० दिवसांच्या कालावधीत सरकारने विद्यार्थ्यांशी चर्चा का केली नाही?या कालावधीत सरकार शांतपणे चर्चा करू शकले असते.परंतू सरकारने उपोषण कर्त्यांसोबत कोणतीही चर्चा न करता फक्त उघड्या डोळ्यांनी तमाशा पहाण्याचे काम केले आणि २० जुलै २०२६ ला जे व्हायचे नाही ते घडले व लोकशाही प्रणालीवर घणाघाती प्रहार करून लोकशाहीची वाट लावून लाठीचार्ज व बळाचा वापर सरकारने केला. विद्यार्थ्यांचे जंतरमंतरवर शांततेत तब्बल ३० दिवस आंदोलन चालले हे सरकारला किंवा मोहनजी भागवतांना त्यावेळी का दिसले नाही! असाही प्रश्न उपस्थित होतो.सरकारने आंदोलनादरम्यान एक-दोन दिवसांत विद्यार्थ्यांसोबत चर्चा का केली नाही? आणि तोडगा का काढला नाही? असे अनेक प्रश्न आजही उपस्थित होत आहे. सोनम वांगचूक यांचे २५ दिवस उपोषण चालले व २६ व्या दिवशी विद्यार्थ्यांच्या आग्रहाखातर उपोषण सोडले.परंतु आंदोलनादरम्यान एक-दोन दिवसांत सरकारने चर्चा केली असती तर कदाचित उपोषण करण्याची गरज भासली नसती व विद्यार्थ्यांना ३५ दिवस आंदोलन करावे लागले नसते व आंदोलनाला हिंसेचे गालबोट लागले नसते.परंतु सरकार तब्बल ३५ दिवस जंतरमंतरच्या आंदोलनाचा उघड्या डोळ्यांनी तमाशा पहात रहाली आणि या आंदोलनाला हिंसक वळण आले व अनेक विद्यार्थी व सुरक्षा कर्मचारी मोठ्या प्रमाणात गंभीर जखमी झाले याला जबाबदार कोण याचाही विचार सरकारने करायला हवा.सरकार परिसीमन बिल मंजूर करण्यासाठी संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करीत आहेत.या अनुषंगाने गुरूवार दिनांक ६ ऑगस्टला शिवसेना (उबाठा) पक्षातून शिवसेनेत आलेल्या सहा खासदारांसह तृणमूल कॉंग्रेसमधून बाहेर पडून ''नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया''या पक्षात गेलेल्या २० हून अधिक संसद सदस्यांसोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नाश्त्याच्या निमित्ताने चर्चा केली.या बैठकीला एनडीएचे ४० हून अधिक खासदार उपस्थित होते.सोबतच अनेक मंत्री सुध्दा उपस्थित होते.या चर्चेदरम्यान पंतप्रधानांनी एनडीएमध्ये प्रवेश करणाऱ्या खासदारांना आश्वस्त केले की, चिंता करू नका, मी तुमच्या पाठीशी आहे याचेही स्वागत!अशाच पध्दतीने सरकार किंवा पंतप्रधान किंवा इतर मंत्री यांनी जंतरमंतरवर जाऊन विद्यार्थ्यांसोबत (जेन-झी सोबत) आंदोलनादरम्यान एक-दोन दिवसांत सरकारच्या वतीने चर्चा केली असती आणि ''चिंता करू नका मी तुमच्या पाठीशी आहे''असे म्हटले असते तर कदाचित आंदोलन शांततेत पार पडले असते व सहज मार्ग निघाला असता.परंतु सरकारने किंवा सरकारमधील मंत्र्यांनी विद्यार्थ्यांसोबत चर्चा करण्याला थोडेसेही महत्त्व दिले नाही व वर्चस्वाची लढाई समजून चर्चेसाठी टाळाटाळ केली आणि ''हम करे सो कायदा'' अशी रणनीती दिसायला लागली.परंतु स्वतःच्या स्वार्थासाठी इतर पक्षांतील फुटुन आलेल्या खासदारांनसोबत वेळेतूनवेळ काढून नाश्त्याच्या निमित्ताने पंतप्रधानांनी एनडीएमध्ये प्रवेश करणाऱ्या खासदारांसोबत चर्चा केली व त्यांना सांगितले की, ''चिंता करू नका मी तुमच्या पाठीशी आहे''.हेच वाक्य किंवा अशीच चर्चा माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांसोबत (जेन-झी सोबत) केली असती तर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला असता व लाठीचार्ज झालाच नसता.या संपूर्ण घटनाक्रमावरून लक्षात येते की, सरकारला सत्तेचे घमंड आले असावेत.परंतु सरकार आता म्हणते की,आम्ही विद्यार्थ्यांसोबत आहोत ही गोष्ट अगोदर झाली असती तर विद्यार्थ्यांच्या जखमेवर फुंकर घातल्या सारखे झाले असते. परंतु सरकारने प्रथम बळाचा वापर केला आणि आता आम्ही जेन-झी सोबत आहोत असे म्हणतात हे कितपत योग्य म्हणावे ही बाब देशाच्या १४५ कोटी जनतेला हळूहळू लक्षात येत आहे.माझ्यामते सरसंघचालक मोहनजी भागवत यांनी जेन-झी सोबत संवाद साधण्यास खूप उशीर केला असावा. हाच संवाद भागवतांनी आंदोलनाच्या एक-दोन दिवसांच्या काळात साधला असता तर कदाचित सरकारला जाग आली असती व विद्यार्थ्यांसोबत चर्चा करता आली असती. सरसंघचालक देशहिताचेच मुद्दे मांडतात यात दुमत नाही.परंतु सरकार त्यांच्या मुद्यांना कितपत मानतात हाही विचारांचा प्रश्न आहे. भागवत म्हणतात की, शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद केली पाहिजे आणि शिक्षण हा धंदा नाही. ही बाब बरोबर आहे.परंतु सध्याच्या परिस्थितीत देशात शिक्षण हा फक्त धंदा बनल्याचे दिसून येते.त्यामुळेच देशात पेपर फुटीसारखे गैरप्रकार दिसून येतात.कारण जोपर्यंत आमदार-खासदार,मंत्री, उच्चपदस्थ अधिकारी, राजकीय पुढारी आपल्या मुलामुलींना सरकारी शाळा-महाविद्यालये दाखल करीत नाहीत तोपर्यंत शिक्षण प्रणालीत सुधारणा शक्य नाही.जी कंगना राणावत ''जेन-झीला जनरेशन गटार आहे''म्हणाली होती ती आज जेन-झी ला भारताची सर्वात मोठी ताकद व संस्कृतीची मोठी ओळख असल्याचे सांगत आहेत.म्हणजे पहिले गटार म्हणायचे आणि आता चांगले म्हणायचे ही कसली लोकप्रतिनिधी म्हणावी! कंगना राणावतने आता लोकप्रतिनिधी पदाचा त्याग केला पाहिजे व चित्रपटांमध्ये काम करायला पाहिजे.जय हिंद!



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# ॲग्रोव्हिजन गटशेती संघाचे अकोला देव येथे मासिक चर्चासत्र उत्साहात संपन्न

## शेतकऱ्यांनी आधी स्वत:साठी जगले पाहिजे - संजय मोरे

**जालना - प्रतिनिधी**

शेतकऱ्यांनी केवळ शेती आणि कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी आयुष्य खर्ची न घालवता, स्वतःच्या आनंदासाठी, आरोग्यासाठी आणि सर्वांगीण विकासासाठीही जगणे गरजेचे आहे. शेती करतांना आर्थिक नियोजन, आधुनिक तंत्रज्ञान, सामूहिक शेती आणि बाजारपेठेचा अभ्यास यांना प्राधान्य दिल्यास शेतकरी अधिक सक्षम होऊ शकतो असे प्रतिपादन ॲग्रोव्हिजन गटशेती संघाचे संस्थापक प्रमुख संजय मोरे पाटील यांनी केले.

अकोला देव, ता. जाफराबाद येथे ॲग्रोव्हिजन गटशेती संघाच्या नियमित मासिक चर्चासत्राचे रविवार ( दि. ९ ऑगस्ट ) रोजी



आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. शेतीतील बदलते तंत्रज्ञान, उत्पादन खर्च कमी करणे, गुणवत्तापूर्ण उत्पादन, बाजारपेठेचा अभ्यास, सामूहिक प्रयत्न आणि शेतमालाला योग्य बाजारभाव मिळवून देण्यासाठी शेतकऱ्यांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज यावर विचारमंथन झाले.

यावेळी बोलताना संजय मोरे पाटील म्हणाले की, शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. मात्र, स्वतः च्या जीवनाकडे दुर्लक्ष करून केवळ शेती आणि कुटुंबासाठी धावपळ करणे योग्य नाही. शेतकऱ्यांनी आधी स्वतःसाठी जगणे शिकले पाहिजे. आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याबरोबरच आरोग्य, कुटुंब, सामाजिक जीवन आणि मानसिक समाधान यांनाही महत्त्व दिले पाहिजे. शेती ही केवळ उत्पादन घेण्याची प्रक्रिया नसून ती नियोजनबद्ध व्यवसाय म्हणून करण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीसोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा, एकमेकांच्या अनुभवातून शिकावे आणि गटशेतीच्या माध्यमातून उत्पादनापासून बाजारपेठेपर्यंतची साखळी मजबूत करावी, असे आवाहन त्यांनी केले.

ॲग्रोव्हिजन गटशेती संघाच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांमध्ये सातत्याने संवाद, ज्ञानविनिमय आणि सामूहिक शेतीची चळवळ निर्माण करण्याचे काम सुरू आहे. नियमित चर्चासत्रांच्या (पान २ वर)

# टेंभुर्णी येथील योगेश कुमकर यांचा स्तुत्य उपक्रम

## गेल्या ४ वर्षांपासून रोज घरासमोर चिमण्यांसाठी टाकतात दाणे

**दत्ता देशमुख**

आजच्या धावपळीच्या युगात माणसाचे निसर्गाकडे दुर्लक्ष होत असताना, जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथील योगेश कुमकर यांनी मात्र निसर्गाशी आणि मुक्या पक्षांशी असलेले आपले नाते घट्ट जपले आहे. योगेश कुमकर हे गेल्या ४ वर्षांपासून दररोज न चुकता आपल्या घरासमोर चिमण्यांसाठी दाणे टाकतात.दररोज सकाळी उजाडताच चिमण्यांची किलबिलाट सुरू होते. योगेशजी घराबाहेर येऊन पक्ष्यांसाठी दाणे आणि पाण्याची सोय करतात. गेल्या ४ वर्षांच्या या सातत्यामुळे आता चिमण्या आणि त्यांच्यात एक अनोखे नाते तयार झाले असून, चिमण्याही रोज सकाळी या मायेच्या घासाची वाट पाहत असतात.



योगेशजींनी टाकलेले दाणे टिपण्यासाठी त्यांच्या अंगणात चिमण्यांची मोठी गर्दी पाहायला मिळते.या उपक्रमाबद्दल बोलताना योगेश कुमकर सांगतात की, ''पक्ष्यांना दाणे टाकल्याने मनाला एक वेगळेच समाधान आणि शांतता मिळते. आपण निसर्गाचे काहीतरी देणे लागतो, याच भावनेतून मी गेल्या ४ वर्षांपासून हे रोज करतो.''आजच्या काळात चिमण्यांची संख्या घटत असताना, टेंभुर्णी येथील योगेश कुमकर यांनी जपलेले हे पक्षीप्रेम खरोखरच कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे. त्यांच्या या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

गेल्या चार वर्षांपासून रोज सकाळी घरासमोर चिमण्यांना दाणे टाकणे हा आता माझ्या आयुष्याचा एक अविभाज्य भाग बनला आहे. सुरुवातीला मी सहज म्हणून काही दाणे टाकले होते, पण हळूहळू चिमण्यांची संख्या वाढत गेली आणि आता तर रोज सकाळी त्या माझी वाट पाहत असतात. सकाळी उठल्या उठल्या त्यांचा तो किलबिलाट ऐकला की मनातील सगळा ताणतणाव निघून जातो.

# टेंभुर्णी येथील मुख्य चौकात मोकाट कुत्र्याची दहशत

## ग्रामस्थ भयभीत, तात्काळ बंदोबस्त करण्याची मागणी

**टेंभुर्णी - दत्ता देशमुख**

जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी आणि परिसर सध्या मोकाट व भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे त्रस्त झाला आहे. गावातील मुख्य चौक, गल्ल्या, शाळा परिसर आणि कचरा कुंड्यांजवळ या कुत्र्यांचे मोठे कळप पाहायला मिळत असून, यामुळे लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये कमालीचे भीतीचे



वातावरण पसरले आहे.दुचाकीस्वार आणि पादचाऱ्यांवर हल्लेगेल्या काही दिवसांत मोकाट कुत्र्यांनी रस्त्यावरून जाणाऱ्या अनेक (पान २ वर)

# शिक्षणासोबत कौशल्य विकासाची जोड द्या; तरुणांनी उद्योजकतेतून स्वावलंबी व्हावे

## वडीगोद्री येथे पशुसंवर्धन आधारित व्यवसाय प्रशिक्षणाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**वडीगोद्री - प्रतिनिधी**

सम्राट अशोक यांच्या काळात कौशल्य विकासाला महत्त्व दिले जात असल्याने तत्कालीन जनता आर्थिकदृष्ट्या सक्षम होती.आजच्या काळातही तरुणांनी शिक्षणासोबत कौशल्य विकसित करून आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर घडवावे.वाढती बेरोजगारी भविष्यात समाजासाठी मोठी समस्या ठरू शकते.त्यामुळे कौशल्याधारित शिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या माध्यमातून तरुणांना सक्षम करणे आवश्यक असून,यातूनच भारत महासत्ता होण्याच्या दिशेने वाटचाल करू शकतो, असे प्रतिपादन खरपुडी येथील प्रा.डॉ.हनुमंत आगे यांनी केले.

अंबड तालुक्यातील वडीगोद्री येथे महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र,जालना,शांताई सामाजिक युवा प्रतिष्ठान व शांताई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने (पान २ वर)

# घनसावंगी तालुका किसानसेना प्रमुखपदी भाऊसाहेब गणपत जाधव यांची निवड

**घनसावंगी - प्रतिनिधी**

शिवसेना पक्षाच्या माध्यमातून घनसावंगी तालुक्यातील पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी व शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी भाऊसाहेब गणपत जाधव यांची शिवसेना किसानसेना तालुका प्रमुख पदी अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्तीचे पत्र शिवसेना तालुकाप्रमुख अनिरुद्ध बाळासाहेब शिंदे यांच्या हस्ते देण्यात आले.ही नियुक्ती शिवसेना मुख्य नेते तथा



उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या आदेशानुसार आणि शिवसेना नेते हिकमत दादा उदाण साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

वंदनीय हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार,धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची शिकवण (पान २ वर)

# कत्तलीविरोधात आंदोलन, पण प्लास्टिक खाऊन मरणाऱ्या गायींकडे मात्र दुर्लक्ष!

## कालीकुर्ती परिसरातील शहरी कचरा डेपोमुळे गोवंशाचा जीव धोक्यात, महापालिकेचे आश्वासन हवेतच

**जालना - प्रतिनिधी**

शहरात गोहत्येच्या विरोधात रस्त्यावर उतरून जोरदार आंदोलन करणारे गोरक्षक प्रत्यक्षात गायींच्या मृत्यूमागील खऱ्या आणि रोजच्या कारणाकडे मात्र सोयीस्करपणे डोळेझाक करत असल्याचे चित्र जालना शहरात पाहायला मिळत आहे. शहरातील गायींसाठी प्रसिद्ध असलेल्या कालीकुर्ती परिसरातच शहराचा कचरा डेपो थाटलेला असून, याच डेपोत मोठ्या प्रमाणावर गायी प्लास्टिक कचरा खाऊन आजारी पडत असल्याचे व त्यातून त्यांचा मृत्यू होत असल्याचे वास्तव समोर आले आहे. मात्र गोरक्षकांचे आंदोलन केवळ कत्तलखान्यांभोवती केंद्रित असून, शहरातील अस्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनाच्या प्रश्नाकडे मात्र कोणीही गांभीर्याने पाहत नसल्याची खंत व्यक्त होत आहे. कालीकुर्ती परिसर हा जालना शहरात गोपालनासाठी विशेष ओळखला जातो. या भागात मोठ्या संख्येने गोवंश मुक्तपणे फिरत असतो. मात्र दुर्दैवाची बाब म्हणजे याच परिसरात शहरातील कचरा टाकण्यासाठी डेपो उभारण्यात आलेला आहे. या डेपोत रोज टनावारी कचरा टाकला जातो, ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिक पिशव्या आणि इतर टाकाऊ पदार्थांचा समावेश असतो. भुकेल्या गायी या कचऱ्यातील प्लास्टिक खाद्यपदार्थ समजून खातात आणि हळूहळू त्यांच्या पोटात प्लास्टिकचा साठा वाढत जातो. परिणामी गायी गंभीर आजारी पडतात आणि अनेकदा उपचारादरम्यान किंवा उपचाराअभावी त्यांचा मृत्यू होतो. विशेष म्हणजे जालना महानगरपालिकेने काही काळापूर्वी हा कचरा डेपो शहराबाहेर स्थलांतरित करण्याचे जाहीर आश्वासन दिले होते. मात्र आजतागायत या आश्वासनाची पूर्तता झालेली नाही. डेपो अजूनही शहराच्या मध्यवर्ती भागातच कार्यरत असून, नागरिक आणि गोवंश दोघांच्याही आरोग्यास याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. महापालिकेच्या उदासीन कारभारामुळे हा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित राहिला आहे. या संदर्भात बोलताना ॲड. महेश धनावत यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, ''गोहत्येच्या विरोधात आवाज उठवणे हे निश्चितच योग्य आहे, परंतु ज्या गायी आपल्या डोळ्यांसमोर रोज प्लास्टिक खाऊन तडफडून मरत आहेत, त्यांच्याविषयी मात्र कोणीही बोलायला तयार नाही, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. खऱ्या गोरक्षणाची सुरुवात स्वच्छतेपासून व्हायला हवी. कालीकुर्ती परिसरातील कचरा डेपो तात्काळ हटवला गेला पाहिजे. गोरक्षकांनी आता आपला मोर्चा (पान २ वर)

# लायन्स क्लबतर्फे गोकुळ नगर येथे उत्साहात वृक्षारोपण; २० झाडांना बसवल्या संरक्षक जाळ्या

**परतूर - प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत लायन्स क्लबचे सचिव कैलास तांगडे व गणेश सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त शहरात वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. गोकुळ नगर कॉलनीतील ओपन स्पेस (मोकळ्या जागेत)मध्ये हा उपक्रम उत्साहात राबवण्यात आला. सदर संपूर्ण कार्यक्रम दोन्ही सदस्यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून स्वतः प्रायोजित केला होता.वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून समाजाला पूरक असा उपक्रम राबवण्याचा संकल्प दोन्ही सदस्यांनी केला होता. या कार्यक्रमाला लायन्स क्लबचे अध्यक्ष महेश होलानी, सचिव कैलास तांगडे, कोषाध्यक्ष नरपत जांगीड तसेच



दृष्टी फाउंडेशनचे अध्यक्ष मनोहर खलापुरे प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी पिंपळे सर, प्राध्यापक दिनकर टकले, शिल्पा होलानी आणि लिओ क्लबचे अध्यक्ष जयेश होलानी यांची देखील उपस्थिती होती.या उपक्रमांतर्गत गोकुळ नगर परिसरात विविध प्रकारची २० झाडे लावण्यात आली. लावलेली झाडे सुरक्षित राहावीत म्हणून त्यांना स्वखर्चाने संरक्षक जाळ्या (ट्री गार्ड) देखील बसवण्यात आल्या.

या झाडांचे केवळ रोपण न करता, त्यांच्या नियमित संगोपनाची जबाबदारीही कॉलनीवासीयांच्या मदतीने घेतली जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या स्तुत्य उपक्रमाचे कॉलनीतील नागरिकांनी कौतुक केले. वृक्षारोपण प्रसंगी लिओ क्लबचे सदस्य नैतिक नहार, शगुन होलानी, दत्ता खुळे ,आशिष सकलेचा, रोहित दरगड यांच्यासह कॉलनीतील नागरिक आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# शोषितांच्या हक्कासाठी अण्णाभाऊंचे विचार प्रेरणादायी: सतीशराव घाटगे

## अंतरवाली टेंभी येथे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती सोहळा उत्साहात

**घनसावंगी - प्रतिनिधी**

शोषित, वंचित आणि कष्टकरी समाजाच्या वेदनांना आपल्या लेखणीच्या आणि शाहिरीच्या माध्यमातून आवाज देणारे साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त धनंजय आप्पा कोल्हे मित्र मंडळ व अंतरवाली टेंभी ग्रामस्थांच्या वतीने आयोजित जन्मोत्सव सोहळा उत्साहात पार पाडला. या कार्यक्रमास समृध्दी साखर कारखान्याचे चेअरमन सतीशराव घाटगे, आझाद क्रांती सेनेचे प्रमुख श्री. राजेशभाऊ घोडे, श्री. धनंजय आप्पा कोल्हे यांची



प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या उपस्थितीत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. तसेच उपस्थित समाजबांधवांशी संवाद साधला. यावेळी शाळकरी विद्यार्थ्यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा आपल्या भाषणातून जागर केला. यावेळी सतीश घाटगे यांनी आपल्या भाषणात अण्णाभाऊंनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजातील उपेक्षित घटकांच्या व्यथा मांडतानाच, स्वाभिमान, समता आणि परिवर्तनाची ज्वाला पेटवली. त्यांचे विचार केवळ इतिहासाचा भाग नसून, आजही सामाजिक न्यायापासून वंचित असलेल्या शोषित घटकांना त्यांचा हक्क मिळवण्यासाठी आणि समानतेच्या वाटचालीसाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले. अण्णाभाऊ साठे यांच्या परिवर्तनवादी विचारांचा वारसा जपत समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास आणि न्याय पोहोचविण्यासाठी आपण सर्वांनी कटिबद्ध राहूया.

वंचित, शोषित घटकांच्या न्याय आणि हक्काच्या लढ्यात मी कायम सोबत राहीन, असा विश्वास त्यांनी दिला. या कार्यक्रमांसाठी विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन श्री धनंजय कोल्हे, जावेद शेख, भाजपा कार्यकर्ते संदीप शर्मा, पांडुरंग पाटोळे, काकासाहेब नळगे, साहेबराव कांबळे यांच्यासह धनंजय आप्पा कोल्हे मित्र मंडळाच्या सदस्यानी परिश्रम घेतले. या जयंती उत्सव सोहळ्यासआझाद क्रांती सेनेचे प्रमुख श्री. राजेशभाऊ घोडे, श्री. धनंजय आप्पा कोल्हे, भाजपाचे ओबीसी मोर्चाचे तालुका अध्यक्ष माधव टेहळे, समृद्धी साखर कारखान्याचे संचालक रंजित उढाण, स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, गावातील तरुण मित्र व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदखेडा, किन्ही, काचनेरा परिसरात रात्रीला सिंगल फेज वीजपुरवठ्याची मागणी; अन्यथा आंदोलनाचा इशारा

**दत्ता देशमुख**

जाफ्राबाद तालुक्यातील गट ग्रामपंचायत नांदखेडा, किन्ही व काचनेरा परिसरात रात्रीला सिंगल फेज वीजपुरवठा सुरू करण्यात यावा, अन्यथा महावितरणच्या उपकार्यकारी अभियंता कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सरपंच सौ. सूर्यकलाबाई गुलाबराव सवडे यांनी दिला आहे. याबाबत उपकार्यकारी अभियंता, महावितरण उपविभाग, जाफ्राबाद यांना निवेदन सादर करण्यात आले. पावसाळ्यामुळे शेतात सर्प व विंचूंचा वावर वाढला असून रात्रीच्या अंधारात शेतकऱ्यांसह मुक्या जनावरांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच परिसरात रात्री उशिरा वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांना शेतीची कामे करताना अडचणी येत आहेत. विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही त्याचा विपरीत परिणाम होत असल्याने रात्री सिंगल फेज वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास महावितरण कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. या निवेदनावर उपसरपंच भरत (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.